## नियमित दिवाणी दावा क्र.१०३/२०१६

## नि. १०४ वरील आदेश

**(सुरेश पाटील वि. श्रीपाद पाटील व.१०)**

प्रस्तुतचा अर्ज वादी यांनी दाखल करुन, प्रस्तुत दाव्याच्या कामी ओरोस येथील मे.दिवाणी न्यायाधीशसाो (व.स्तर) यांचे न्यायालयात स्पे.दि.मु.नं.६/२००८, स्पे.दि.मु.नं.७/२००८ व स्पे.दि.मु.नं.८/२००८ चे कामी वादीस पक्षकार करुन घेण्याचा अर्ज मंजुर करण्याबाबत दि.२४.०१.२०११ रोजी आदेश मा. नामदार मुंबई येथील उच्च न्यायालयात रिट याचिका क्र.७२९७/२००१ द्वारे आव्हानीत केलेला होता. सदर याचिका मा. उच्च न्यायालयाने दि.०५.०३.२०१४ रोजीच्या आदेशाने फेटाळल्या आहेत. त्यामुळे सदरचा आदेशाबाबतची कागदपत्रे प्रस्तुत दाव्याच्या कामी स्विकारण्यात यावी अशी त्यांनी विनंती केलेली आहे.

२. वादी यांचे प्रस्तुतचे अर्जावर प्रतिवादी क्र.५ ते ७ यांनी म्हणणे दाखल करुन अर्जावर हरकत नोंदविलेली आहे. प्रतिवादी क्र.५ ते ७ यांचे म्हणणे की, प्रस्तुत कागदपत्रांचा प्रस्तुत दाव्याशी संबंध नाही त्यामुळे प्रस्तुत कागदपत्रांचा या दाव्याचे कामी विचार करता येणार नाही. सबब, प्रतिवादी क्र.५ ते ७ यांनी प्रस्तुतचा अर्ज नामंजुर करण्याची विनंती केलेली आहे.

३. अर्ज म्हणणे व अभिलेखाचे अवलोकन केले.

४. प्रस्तुत दाव्याचा अंतिम न्यायनिर्णय गुणदोषावर होण्याकरिता सदर कागदपत्रे अभिलेखावर आलेस न्यायोचित होईल. प्रस्तुतचे दाखल कागदपत्रे हे प्रस्तुत दाव्याशी संबंधीत आहेत किंवा कसे, याबाबत सध्यस्थितीत कोणतेही निष्कर्ष देणे योग्य होणार नाही. वादी वप्रतिवादी यांना सदर कागपत्रांच्या अनुषंगाने आपला पुरावा नोंदविण्याची पुर्ण संधी उपलब्ध आहे. त्यामुळे त्यांचे कोणतेही नुकसान होताना दिसून येत नाही. तसेच कागदपत्रे केवळ अभिलेखावर दाखल केल्याने शाबीत झाले, असे म्हणता येणारे नाही. त्याबाबत वादी यांनी आपला योग्य तो पुरावा सादर करणे गरजेचे आहे. सबब, मी पुढीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

**-:: आदेश ::-**

१. वादी यांचा नि.१०४ कडील अर्ज त्यांच्या विधिग्राह्यतेच्या अधिन राहून मंजूर करणेत येत आहे.

२. दोन्ही बाजूंनी आपाआपला खर्च सोसणेचा आहे.

(आदेश खुल्या न्यायदालनात जाहीर.)

सही/-

दिनांक:- २४/०४/२०२६

( एन.ए.बकरे )

ठिकाण:- कुडाळ

सह दिवाणी न्यायाधीश (क. स्तर),

कुडाळ.